नि.५ पुढे सुरु.

<u>फिर्यादी यांचा आरोपीतर्फे ॲड. श्री. व्ही. एस. उदगावे यांचेमार्फत शपथेवर उलटतपास–</u>

९. मी सन १९९९ पासून शासकीय ठेकेदार म्हणून काम करत आहे. माझ्याकडे शासकीय ठेकेदार म्हणून काम करण्याचा परवाना आहे. माझे वार्षिक उत्पन्न अंदाजे बारा लाख पर्यंत आहे. मी अंदाजे मागील वीस ते पंचवीस वर्षापासून आयकर विवरण भरत आहे. मी माझे आयकर विवरण न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. माझ्याकडे सन २०२० मध्ये आरोपीला देण्यासाठी रक्कम होती हे दाखवणारा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. असा पुरावा मी न्यायालयात हजर करण्यास तयार आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हे आमदार हाफीज धतुरे यांचे भाचे व जावई आहेत व मी शासकीय ठेकेदार असल्याने माझी ओळख आमदार हाफीज धतुरे यांच्यामार्फतीने आरोपीसोबत झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा जमिनींचे प्लॉटींग करून त्याचे खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची आर्थिक परिस्थिती पूर्वीपासून सधन होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा एमआयडीसी मध्ये स्वतःचा कारखाना आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे सासरे हे मिरज मतदार संघामध्ये दोन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले आहेत. हे मला माहिती नाही की, आरोपीचे साडू हे मिरजेतील प्रसिद्ध डॉक्टर आहेत.

११. मी आरोपीला रक्कम रूपये तीस लाख ही कशासाठी लागणार होती याबाबत चौकशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, एप्रिल २०२० मये आरोपीला रक्कम रुपये तीस लाखाची गरज होती व सदरील रक्कमेची त्याने माझ्याकडे मागणी केली होती असा कोणातही प्रकार घडला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला रक्कम रुपये सोळा लाख हे त्याने

त्याच्या व्यवसायात गुंतवावे व त्याचा लाभांश मला मिळावा या करिता दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे रक्कम रुपये तीस लाख मी आरोपीला कधीही दिलेले नव्हते. हे मला माहिती आहे की एखाद्या व्यक्तीला दोन लाखाहून वरील रक्कम ही द्यायची होती तर ती रक्कम बँकेमार्फत द्यावी लागते याची मला माहिती आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अशी रक्कम वीस हजाराहून अधिक असेल तर ती चेकद्वारे द्यावी असा नियम आहे, मात्र आरोपी हा माझा मित्र असल्याने मी त्याला हातउसने रक्कम दिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे रक्कम रुपये चौदा लाख हे मी कधीही आरोपीला रोखीने दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे आरोपीला रोखीने चौदा लाख रुपये दिले होते हे दाखवणारा माझ्या तोंडी शब्दाव्यतिरिक्त माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सी.ए. यांना आयकर विवरण भरतेवेळी संबंधीत वर्षातील आर्थिक व्यवहाराबाबत माहिती देणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, आयकर विवरण भरताना बॅलन्सशीट मध्ये वर्षभरात झालेल्या आर्थिक व्यवहाराची नोंद घेतली जाते.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणातील आरोपीला त्याच्या व्यवसायात गुंतवण्यासाठी जी रक्कम दिली होती त्या रक्कमेच्या सुरक्षिततेपोटी प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त धनादेश आरोपीकडून घेतलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला पैसे दिले होते त्यावेळी देशामध्ये दोन वर्षासाठी कोरोना लॉकडाउन कालावधी चालू होता. हे मला माहिती नाही की, सदर कालावधीमध्ये आरोपीच्या रिएल इस्टेट व्यवसायामध्ये मंदी आली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला त्याच्या व्यवसायामध्ये मंदी असल्याने तो रक्कम रूपये सोळा लाख परत करण्यास तयार आहे असे मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६.११.२०२३ रोजी आरोपी माझे रक्कम

**नि.५ पुढे सुरु.**

रुपये तीस लाख इतके कोणतेही देणे लागत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दि.०६.११.२०२३ रोजी मला रक्कम रुपये तीस लाख देणे लागत होता हे दाखवण्याकामी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदरील देणे दाखवण्याकामी माझ्याकडे माझे आयकर विवरण आहे व ते मी हजर करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला दिलेली रक्कमेची मागणी केली असता त्याने मला प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त धनादेश देऊन तो वटवण्यासाठी दिला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला दिलेल्या कोरा धनादेशाचा गैरवापर करून मी प्रस्तुतचे खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्या नोटीसला त्याच्या वकीलांमार्फत उत्तर दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कधीही मला रक्कम रुपये तीस लाख इतके कायदेशीर देणे लागत होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2025.10.03 10:45:39 +0530

**सांगली.**
**दि.०१/१०/२०२५.**

**(रोहिणी सं. पाटील)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र. १),**
**सांगली**